


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ७८, गुरुवार १३ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेर शहरात दिवसा ढवळ्या रोड रॉबरी !

## ■ पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत नेमकं काय चाललंय ? ■ महाविद्यालयात चाकू हल्ला ■ नगर-कल्याण महामार्गावरही लुटणारे रॅकेट ■ पानोलीतील बिंगोचा फलकही चर्चेत ■ डीबी ब्रँच कशाला ? वसुलीला ?

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर, सुपा रस्त्यावर शहराच्या हद्दीत कन्हेर ओहळ येथे बुधवारी दुपारी भर दिवसा दुचाकीस्वाराला आडवून त्याच्या गळयातील चार लाख रूपयांची सोन्याची साखळी लांबविल्याची घटना घडली. पारनेर महाविद्यालयात विद्यार्थ्याने विद्यार्थ्यावर केलेला कोयत्याने हल्ला, बिंगोसारख्या भयंकर जुगाराविरोधात पानोलीमध्ये लागलेला फलक तसेच नगर कल्याण महामार्गावरील लिफ्ट देऊन लुटणारे रॅकेट या ताज्या घटनांकडे पाहता पारनेरमध्ये नेमकं चाललंय काय ? असा सवाल पारनेरकर करत आहेत. पारनेर पोलीस ठाण्याची डीबी ब्रँच नेमके करते काय गुन्ह्यांचे पृथःकरण की वसुली असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.**

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार पुणेवाडी येथील बबुशा बाळू बोरूडे वय ६० व त्यांची पत्नी इंदुबाई हे दोघे त्यांच्या दुचाकीवरून बुधवारी सकाळी ७ वाजता त्यांचे चुलत मेहुणीच्या मुलाच्या दशक्रियाविधीसाठी टाकळी ढोकेश्वर येथे गेले होते. दशक्रिया विधी आटोपून सकाळी ११ वाजण्याच्या बोरूडे दाम्पत्य पुन्हा पुणेवाडीच्या दिशेने निघाले. दरम्यानच्या काळात बोरूडे यांच्या मावस सासुबाई सोनाबाई हारदे यांना भेटण्यासाठी वडनेर हवेली येथे जाण्याचे दाम्पत्यामध्ये ठरले. पारनेर शहर ओलांडून त्यांची दुचाकी शहरानजीक कन्हेर ओहळ येथे आली असता पाठीमागून एक काळया रंगाची मोटारसायकल आली. बोरूडे यांच्या दुचाकीसोबत त्यांची दुचाकी चालवत बोरूडे यांना त्यांची दुचाकी थांबविण्यास भामटयांनी भाग पाडले. त्यानंतर बतावणी करत बोरूडे यांना त्यांच्या गळयातील साडेचार तोळयांची, चार लाख रूपयांची सोन्याची चेन काढण्यास भामटयांनी भाग पाडले. सोन्याची चेन काढून दिशाभूल करत भामटे घटनास्थळावरून पसार झाले.

### पंचामध्ये चेन आढळून आली नाही

तोतया पोलिस अधिकारी कर्मचारी यांनी सल्ला दिल्याने पंचामध्ये सोन्याची चेन, घडयाळ तसेच डायरी ठेवल्यानंतर बोरूडे दाम्पत्याने पुढे जात गणपती फाटा येथे दुचाकी थांबवून खात्री करण्याचा प्रयत्न केला असता त्यात घडयाळ तसेच खिशातील डायरी व्यतिरिक्त काहीही आढळून आले नाही. त्यानंतर बोरूडे दाम्पत्यास आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

पारनेर दर्शन Special



### आम्ही पोलीस आहोत, शासकीय अधिकारी आहोत !

कन्हेर ओहळ परिसरात बोरूडे यांच्या दुचाकीस समांतर दुचाकी चालवत भामटयांनी बोरूडे यांना त्यांची दुचाकी रस्त्याच्या बाजूस घेण्यास सांगितले. आम्ही पोलीस आहोत, शासकीय अधिकारी आहोत, रात्री इथे काय घडले हे माहीती आहे का ? अशी विचारणा करत आम्ही चौकशी करत आहोत. दिवसा ढवळया गळयात काहीही घालू नका. अशी बतावणी करत भामटयांनी बोरूडे यांना त्यांच्या गळयातील चार तोळयांची चेन काढण्यास भाग पाडले.

### तोतया पोलीसही चॅलेंज करताहेत !

भामटयांनी बनाव करून बोरूडे यांना गळयातील चेन काढण्यास भाग पाडल्यानंतर भामटयांनी बोरूडे यांच्या गळयातील पंचा काढून तो दुचाकीच्या सिटवर ठेवला. त्यात बोरूडे यांच्या गळयातील चार लाखांची सोन्याची चेन, हातातील घडयाळ व खिशातील डायरी भामटयांनी लपेटून ठेवल्याचा बनाव केला. पंचामध्ये ठेवण्यात आलेल्या वस्तू पंचासह बोरूडे यांच्या पत्नीच्या हाती देउन तोतया पोलीस घटनास्थळावरून निघून गेले. पारनेर पोलीसांना तोतया पोलीसही चॅलेंज करताहेत हे यावरून स्पष्ट होत आहे.

### पारनेर पोलीसांचे अस्तित्व नेमके दिसते कुठे ?

एकीकडे भामटे पोलीसांची ओळख सांगून दिवसा ढवळया नागरीकांना लुटत असताना दुसरीकडे पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये कर्तव्यावरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे अस्तीत्वच दिसत नाही. एखादी घटना घडली तर सुरूवातीस गृहरक्षक दलाचे कर्मचारी पाठविले जातात. त्यानंतर कर्मचारी येतात. तरीही परिस्थिती हाताबाहेर जात असेल तर थेट पोलिस उपाधीक्षक संपतराव भोसले यांना घटनास्थळी हजर व्हावे लागते, ही पारनेर पोलीस ठाण्याची सद्यस्थिती आहे. नगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक राकेश ओला या घटनांकडे सकारात्मकपणे पाहतील अशी अपेक्षा आहे.

### डीबी ब्रँचचे काम फक्त वसुलीचे ?

पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये येणाऱ्या गुन्हेगारांवर लक्ष ठेवणे, पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घडलेल्या गुन्हयांची उकल करणे यासाठी बहुदा ज्या ब्रँचला पोलीस प्रशासनात मान्यता नाही अशा ब्रँचची जाणीवपुर्वक स्थापना केली जाते. पारनेर पोलीस ठाण्यातही अशी डीबी ब्रँच आहे. गणवेश न घालता साहेबापेक्षाही अधिक रूबाब त्यांचा पहावयास मिळतो. मात्र अवैध व्यवसायीकांच्या संपर्काशिवाय त्यांच्याकडून काहीही काम होत नसल्याचे सी.सी.टी.व्ही. फुटेज, व्हिडीओ रेकॉर्डिंग पारनेर दर्शनच्या हाती आहेत.

# आ. दाते मंत्री गडकरींच्या भेटीला!

## रस्ते कामांना मंजुरी व निधीची मागणी

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**संसद अधिवेशनाच्या पार्श्वभुमीवर पारनेर-नगर मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन मतदारसंघातील विविध रस्त्यांच्या कामांना मंजुरी व निधी देण्याची आग्रही मागणी केली. गडकरी यांच्यासमवेतची भेट समाधानकारक झाली तसेच त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आ. दाते यांनी सांगितले.**



■ आ. काशिनाथ दाते यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन मतदारसंघातील विविध रस्त्यांना निधी देण्याची आग्रही मागणी केली.

पारनेर-नगर मतदारसंघात गेल्या दोन वर्षात अतिवृष्टी झाल्याने विविध रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे अपघातांचे प्रमाणही मोठया प्रमाणावर वाढलेले आहे. परिणामी दळवणळणावर त्याचा परिणाम झाला असून रस्त्याच्या दुरावस्थेमुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो आहे. प्रवाशांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारमार्फत निधी मंजुर करावा अशी मागणी आ. दाते यांनी मंत्री गडकरी यांच्याकडे केली. आ. दाते यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून निधी मंजुर करू अशी ग्वाही मंत्री गडकरी यांनी यावेळी दिली.

### विकासाला गती येईल

रस्त्यांच्या कामांना मंजुरी देण्यासंदर्भात मंत्री नितिन गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने मतदारसंघाच्या विकासाला गती येईल. नागरीकांना चांगल्या सुविधा मिळतील. प्रवाशांचा प्रवास सुखकारक होईल. मागणी केलेल्या सर्व रस्त्यांचा निधी देण्याची ग्वाही मंत्री गडकरी यांनी दिली.

आमदार काशिनाथ दाते
विधानसभा सदस्य

### आ. दाते यांनी मागणी केलेले रस्ते

१) मांडवा - देसवडे -पोखरी - पिंपळगाव रोठा- अक्कलवाडी २९ कि.मी १५/०० ते २४/०० रस्ता सुधारणा करणे,
२) रा. म .मा ७५३ फ वाडेगव्हाण- कडूस - सारोळा सोमवंशी - चंभूर्डी - विसापूर , रा. म. मा.५१६ अ मठ पिंपरी- हातवळण - ते बीड जिल्हा हद्द रस्ता रा. मा. ४८० कि. मी ०२/२०० ते ६/००, ०९/०० ते १८/५०० रस्ता सुधारणा करणे ३) रा. मा ५० ते बोटा - अकलापूर - पोखरी - कामटवाडी - पळशी - वनकुटे रस्ता प्रतिमा. २४ कि मि १६/४०० ते २४/०० रस्ता सुधारणा करणे ४) कौठा, अनगरे - आवी - अजनुज - श्रीगोंदा सुरडी कोळगाव सुरेगाव उखलगाव रांजणगाव वाळवणे ते रा. मा ६९ ला जोडणारा रस्ता ( श्रीगोंदा व पारनेर ) रा. मा ४७९ कि मी ५७/९०० ते ७३/०० रस्ता सुधारणा करणे.
५) राहाता - लोहारे - जाळी - मांडवा - वाडेगव्हाण - श्रीगोंदा रस्ता कर्जत रस्ता रा.मा क्रमांक ६७ भाग मांडवा पारनेर राळेगणसिद्धी वाडेगव्हाण कि.मी ५४/३०० ते ११६/०० ( लांबी ५१.७०० कि.मी ) रस्ता सुधारणा करणे.

# राजन साळवींचा शिवसेनेत प्रवेश

## एकनाथ शिंदेंनी धनुष्यबाण दिले हाती | ठाकरेंना मोठा धक्का

मुंबई : प्रतिनिधी

**राजापूरचे (जि. रत्नागिरी) माजी आमदार राजन साळवी यांचे मागील काही दिवसांपासून सुरू असलेले प्रवेशनाट्य आज (दि.१३) अखेर संपले. त्यांनी आज आपल्या समर्थकांसह टेंभीनाका येथील आनंदाश्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी आनंदाश्रमात मंत्री उदय सामंत, किरण सामंत उपस्थित होते.**



तत्पूर्वी साळवी यांनी आपल्या ठाकरेंच्या शिवसेनेच्या उपनेतेपदाचा राजीनामा दिला होता. शिवसेना पक्षप्रवेशाआधी राजन साळवी यांनी आपल्या समर्थकांसह जोरदार शक्तिप्रदर्शन केले. पक्षप्रवेशासाठी रत्नागिरी आणि राजापूर मतदारसंघांमधून ११ बसेसमधून कार्यकर्ते ठाण्यात दाखल झाले होते.

माजी आमदार साळवी म्हणाले की, पक्ष सोडताना डोळ्यात अश्रू आहेत. पण नवीन पहाट घेऊन सुरूवात करत आहे. रत्नागिरी जिल्ह्याबाबत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी योग्य निर्णय घेतला नाही, अशी खंत त्यांनी यावेळी बोलून दाखवली.

**राजन साळवींनी ठाकरेंची साथ का सोडली?**
विधानसभा निवडणुकीनंतर माजी आ. राजन साळवी हे पक्षात नाराज होते. उपनेते पद असतानाही निवडणुकीच्यावेळी आपल्याला पाठबळ मिळण्याऐवजी धोकाच मिळाल्याचे त्यांनी सांगितले होते. मात्र, त्यांच्या मतांची दखल वरिष्ठ पातळीवर घेतली गेली नाही. त्यामुळे त्यांची नाराजी वाढली होती. त्यानंतर ते भाजपात जाणार अशी चर्चा होती. त्यानंतर शिवसेनेत जाणार असल्याचीही चर्चा सुरु झाली होती. मुळात माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यांशी त्यांचे अगदी घट्ट ऋणानुबंध होते. परंतु शिंदे यांच्या बंडानंतर राजन साळवी त्यांच्यासोबत जाणार असे चित्र होते. परंतु साळवींनी ठाकरेंसोबत राहण्याचा निर्णय उर्वरीत पान ३ वर

# मविआच्या सरपंचाला १ रुपयाही मिळणार नाही !

## निधी हवा असेल तर भाजपात प्रवेश करा | मंत्री नीतेश राणे यांचे वादग्रस्त विधान

सिंधुदुर्ग : प्रतिनिधी

**निधी हवा असेल तर भाजपमध्ये प्रवेश करा. यापुढे महाविकास आघाडीच्या सरपंचाला एक रुपयाचाही निधी मिळणार नाही, असे वादग्रस्त विधान राज्याचे मत्स्य उद्योग व बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री नीतेश राणे यांनी केले आहे. त्यांच्या या विधानाचे राज्याच्या राजकीय वर्तुळात संमिश्र प्रतिसाद उमटत आहेत.**

भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत सिंधुदुर्गच्या कुडाळ तालुक्यात भाजपचा कार्यकर्ता मेळावा झाला. या मेळाव्यात बोलताना मंत्री नीतेश राणे यांनी उपरोक्त फतवावजा विधान केले. नीतेश राणे म्हणाले, भाजप जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात मोठ्या ताकदीने वाढला



पाहिजे. सर्वांनी आगामी निवडणुकांत महायुती सोडून अन्य कुणीही सत्तेत येणार नाही या दृष्टिकोनातून काम करावे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात शतप्रतिशत भाजप निर्माण झाला पाहिजे. विरोधी बाकावर असताना मला खूप त्रास देण्यात आला. निधी देण्याच्या मुद्यावरूनही मला डावलण्यात आले. उर्वरीत पान ३ वर










# प्रगतीमंत्र

## व्यवसायासाठी नियोजन आवश्यक

**व्यवसाय म्हटला, की कक्षा रुंदावणे आले, प्रगती, प्रतिष्ठा, ऐश्वर्यही आले. व्यवसाय उत्तम चालल्यास नुसते पैसेच नाही, तर समाजात मानसन्मान लाभतो. स्वतःचे आयुष्य स्वतःच्या अटींवर जगता येते. व्यवसाय करणारे लोक वेगळेच असतात. त्यांना स्वतःचे असे काही तरी निर्माण करायचे असते. एखाद्या ध्येयाने झपाटलेले लोक ते ध्येय साध्य करण्यासाठी व्यवसाय सुरू करतात आणि स्वतःला त्यात झोकून देतात. सामान्यतः एका व्यवसायिकाचे उत्पन्न हे चांगले असते अथवा ते वाढण्यास भरपूर संधी असते. व्यवसाय जसा मोठा होत जातो, तसे व्यावसायिकाचे उत्पन्न वाढते. हल्लीच्या काळात नोकरीतही चांगला पगार मिळतो. मात्र, व्यावसायिकाला त्याचे उत्पन्न काही पटीने वाढवण्याची शक्यता अधिक असते. आपण आज व्यवसायिकाच्या जीवनातील आर्थिक बाजू समजून घेऊ...**



एखादा व्यवसाय सुरू करताना त्यासाठी योग्य ती आर्थिक तयारी केली असेल, तर व्यवसायात चढउतार आले, तरीही त्यातून सहजपणे बाहेर पडणे शक्य होते. ही तयारी व्यवसाय सुरू करायचा विचार मनात आला, की लगेच सुरू करायला हवी. व्यवसाय सुरू करायच्या आधी व्यवसायाचे नाव ठरवणे, त्याची नोंदणी करणे, बँकेत खाते उघडणे, योग्य ते इतर परवाने काढणे इत्यादी काम हाती घेतले जाते. अनेकदा असे दिसून येते, की काही कारणाने नोकरी गमवावी लागल्याने व्यवसाय करण्याचा विचार काही लोक करतात. काही वेळेस समोरून एखादी संधी चालून आली म्हणून व्यवसाय सुरू करण्याचा विचार केला जातो, तर काही वेळेस अमुक अमुक व्यवसायात चांगला पैसा आहे म्हणून त्यात प्रवेश केला जातो.

### कौशल्ये विचारात घ्या

व्यवसायात नुसते चांगले पैसे आहेत म्हणून किंवा त्याची चलती आहे म्हणून तो करणे कितपत योग्य आहे, हा विचार नीट व्हायला हवा. आपल्यामधे असलेली कौशल्ये कुठल्या कामासाठी अधिक लागू आहेत हे पाहणे महत्त्वाचे असते. उगीच कुणी तरी म्हणते आहे म्हणून त्यांच्या बरोबर व्यवसाय करणे किंवा कोणी व्यवसायात पैसे लावायला तयार आहे म्हणून त्यात उडी घेऊ नये. व्यवसाय सुरू करायच्या आधी त्याबद्दल पूर्ण अभ्यास करायला हवा. व्यवसायात लागणारे भांडवल किती? त्याला बाजारपेठ कशी आहे? आपले कौशल्य व्यवसायासाठी उपयुक्त आहे का? उत्पादन करणार असाल, तर तयार वस्तुसाठी किती मागणी आहे? त्यात एकूण सगळे खर्च जाऊन किती नफा आहे? अशा प्रकारचे अनेक प्रश्न आपल्या मनात येतात आणि त्याची उत्तरे शोधून मग व्यवसाय करावा का नाही आणि कोणता, या निष्कर्षाला यावे. साधारणपणे या गोष्टींचा विचार थोड्या फार प्रमाणात केला जातो. मात्र, व्यवसायाच्या आर्थिक बाबींकडे बरेचसे दुर्लक्ष होताना दिसते.

### चुकीचे पाऊल नको

उत्साहाच्या भरात चुकीची पावले उचलू नयेत. असे म्हटले जाते, की घर पाहावे बांधून, तसेच व्यवसाय पाहावा करून. म्हणजे व्यवसाय करणे तितके सोपे नसते आणि ते प्रत्येकाला जमेलच असे नाही. आपण व्यवसाय करण्यात उत्साही असून उपयोग नाही, व्यवसाय करण्यासाठी धडाडी असावी लागते. कठीण परिस्थितीत तग धरता आला पाहिजे. शांतपणे, संयमाने काम करत राहणे हे आपल्याला जमले, तर आपण व्यवसाय उत्तम प्रकारे करू शकतो. आपण एक चांगले अभियंते असून भागणार नाही, व्यवसायाच्या इतर बाबी आपल्याला समजून शिकाव्या लागतील, तरच आपण यशस्वी व्यावसायिक होऊ शकतो. यासाठी आपल्या मनाची पूर्ण तयारी करायला हवी. एक उत्तम व्यावसायिक होणे जसे कठीण आहे, तसेच ते अशक्य नाही. त्यासाठी चौकस विचार करून, उत्तम नियोजन करून मगच त्यात उतरायला हवे. व्यवसाय सुरू करायच्या आधी उत्पादनाचे आर्थिक गणित, खर्चाची योग्य तरतूद, कर्जाच्या रकमेचा आणि हप्ता याचा अंदाज, व्याजचे गणित, वसूली, नफा, इत्यादी इतर गोष्टींचा मेळ जमला, तर यशस्वी व्यावसायिक होणे शक्य आहे.

### आर्थिक बाबींचा विचार करा

नवीन व्यवसाय सुरू करायचा विचार मनात आला, की आधी त्यासाठी लागणारे भांडवली खर्च कुठले आहेत ते जाणून घ्यावे. त्यानंतर प्रत्येक खर्चाचा आवक जाणून घ्यावा. उत्पादन करायचे असल्यास लागणाऱ्या यंत्राची माहिती घ्यावी आणि त्याचे आयुष्मान लक्षात घेत, त्यातून मिळणारे उत्पादन किती आहे, त्याचे गणित समजून घ्यावे. या सगळ्यासाठी पैसे आपल्याजवळ असतील, तरी पुढे येणाऱ्या खर्चाचा विचार करावा. जसे, की कर्मचाऱ्यांना द्यायचा पगार, विपणन खर्च, जाहिरात इत्यादी. काही महिने किंवा वर्षे आपला व्यवसाय स्थिर होण्यास लागू शकतात, त्याचा अंदाज बांधून तशी तजवीज करावी. व्यवसाय सुरू करताना सरकारकडून मिळणाऱ्या अनुदान आणि विविध योजनांची माहिती घ्यावी. अनुदान मिळते आहे म्हणून व्यवसाय सुरू करणे हे धोरण योग्य नव्हे. अनुदान मिळत असेल, तर त्याचा लाभ घ्यावा. मात्र, अनुदान आहे म्हणून व्यवसाय करणे कितपत योग्य आहे? आपली व्यवसायातील जोखीम उचलण्याची मानसिक तयारी आधी असायला हवी आणि मग आर्थिक तयारी असायला हवी. काही महिन्यांच्या खर्चाची तजवीज असायलाच हवी, शिवाय स्वतःच्या कुटुंबाच्या खर्चाची तजवीज असणेही आवश्यक आहे. ही तजवीज अगदी मूलभूत मात्र अतिशय महत्त्वाची आहे,. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.




## 7 स्टार्टअपच्या टिप्स



**एखादा व्यवसाय सुरू करायचा असतो तेव्हा कल्पनेपासून ते ती कल्पना सत्यात येईपर्यंत या व्यवसायाचा प्रवास घडत असतो. सध्या तरुणांकडे व्यवसायाच्या अनेक संकल्पना आहेत, नवीन तंत्र आहे. आर्थिकतेची जोड देण्याचीही त्यांची तयारी आहे. परंतु योग्य मार्गदर्शन नसल्यामुळे अनेकांना इच्छा असूनही ते स्वतःचा स्टार्टअप सुरू करू शकत नाही.**

१ कल्पनेचा कृती आराखडा : तुमच्या व्यवसायाविषयी तुमच्या मनात असलेली संकल्पना आधी कागदावर लिहून काढा, त्यावर सखोल अभ्यास करा. तसा व्यवसाय आधी कुणी सुरू केला असेल तर त्याचे तपशील मिळवा. त्यात तुम्हाला काय नवीन करता येईल यावर काम करा. शिवाय तुमची संकल्पना सत्यात आणण्यासाठी जे जे आवश्यक आहे त्या बाबींचा कृतीआराखडा तयार करा. जेणेकरून तो व्यवसाय साकार करायला सोपे जाईल.

२ मार्केटचा अभ्यास : तुमच्या व्यवसायाचे मार्केट कसे आहे. त्याला किती मागणी आहे, ग्राहकांच्या अपेक्षा काय आहेत, सध्याचा ट्रेण्ड काय आहे याचा अभ्यास करायला हवा. तुमचे स्पर्धक कोण आहेत, त्यांचे प्रॉडक्ट कसे आहे, तुमच्या उत्पादनाला दुसरे काय पर्याय आहेत याचाही विचार व्हायला. व्यवसाय उत्तम पद्धतीने चालवायचा असेल तर त्या संबधित एकूण बाजाराचे अवलोकन करणे गरजेचे आहे.

३ आर्थिक तरतूद : असं म्हणतात की एखादा व्यवसाय सुरू केला तर त्याला रुळावर यायला किमान तीन वर्षे द्यायला हवीत. व्यवसायाच्या दृष्टीने हा मोठा काळ आहे. कारण व्यवसाय म्हटलं की अनेक जोखीमा आणि संकटे आली. त्यामुळे अशा सर्व गोष्टींना तोंड देऊन व्यवसाय उभा कारचा असेल तर भक्कम आर्थिक पाठिंबा हवा. त्यामुळे व्यवसाय सुरू करण्यासाठी त्याला लागणाऱ्या भांडवलाचा विचार आणि तरतूद करणे आवश्यक आहे.



४ व्यवसायाची जागा : हल्ली ऑनलाइन व्यवसायाची पद्धत रूढ होत असली तरी व्यवसाय करण्यासाठी हक्काची जागा ही लागतेच. तुमच्या व्यवसायाचे स्वरूप काय आहे यावर त्यासाठी किती जागा लागणार हे ठरते. त्यामुळे जागा भाड्याने घ्या किंवा विकत घ्या, व्यवसायाच्या जागेवर बरेच पैसे खर्च होत असतात. त्याची मानसिक आणि आर्थिक तयारी असायला हवी. हे गणित चुकलं की पुढे व्यवसाय डबघाईला येऊ शकतो.

५ पॅकेजिंग आणि मार्केटिंग : तुम्ही काय विकताय त्यापेक्षा ते कशा पद्धतीने विकताय याला खूप महत्व आहे. तुम्ही विकलेली वस्तू वापरल्यानंतर लोक त्यावर मत देतील, पण त्यासाठी आधी त्यांनी ते खरेदी करायला हवे. त्यासाठीच वस्तूचे पॅकेजिंग आणि मार्केटिंग हा भाग अत्यंत महत्वाचा आहे. हल्ली यावर बराच जोर दिला जात आहे. तुमचे उत्पादन अधिक आकर्षक कसे दिसेल, ते लोकांना कसे आवडेल आणि अधिकाधिक लोकांपर्यंत कसे पोहोचेल यासाठी पॅकेजिंग आणि मार्केटिंगचा अभ्यास आवश्यक आहे.

६ ग्राहकांचा विश्वास : तुमचे मार्केटिंग जितके दमदार असेल तितकेच प्रॉडक्टही दर्जेदार असायला हवे. तुमची विकलेले उत्पादन वापरून ग्राहकांचा विश्वास संपादीत व्हायला हवा. त्यामुळे वस्तू, त्याचे दर आणि दर्जा यावर मेहनत घेतली तरी ग्राहकांचा विश्वास जिंकता येतो. शिवाय त्यांची मते जाणून घेऊन आवश्यक ते बदल करणेही आवश्यक असते. ज्याचा व्यवसायावर सकारात्मक परिणाम होतो.

७ नफ्याचे गणित : हे सगळे करताना त्या उत्पादनातून तुमचा नफा होणे हे देखील महत्वाचे आहे. कारण वस्तूची मूळ किंमत, जागेचे भाडे, विजबिल, कर्मचाऱ्यांचे वेतन, मार्केटिंग, पॅकेजिंग, विक्री या सगळ्याचा खर्च लक्षात घेऊन वस्तूचा दर ठरवायला हवा. जेणेकरून तुम्हाला नफ्याचे गणित बसवता येईल. व्यवसाय दीर्घकाळ चालायचा असले तर हे गणित आखणे महत्वाचे असते.

## रेल्वेत कमी खर्चात वर्षभर चालणारा व्यवसाय

**रेल्वेचे भारतीय लोकांच्या जीवनात खूप महत्त्व आहे. दररोज लाखो लोक रेल्वेने प्रवास करतात. भारतीय रेल्वेची देशभरात विविध ठिकाणी अनेक स्थानके असून या स्थानकांवर अनेक प्रकारचे खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आहेत. जेणेकरून प्रवाशांच्या खाण्यापिण्याची गैरसोय होऊ नये. त्याच वेळी तुम्हाला माहिती आहे का की भारतीय रेल्वे तुम्हाला कमाईची एक उत्तम संधी देत आहे. यामध्ये रेल्वे पँट्री कारच्या माध्यमातून लोकांना कमाईची संधी देत आहे.**



भारतीय रेल्वे देशातील १४ लाख लोकांना थेट रोजगार उपलब्ध करून देते तर अप्रत्यक्षपणे अनेक व्यवसाय आणि नोकरीच्या संधी देतात. रेल्वे स्थानकांवर स्टॉलसह गाड्यांमध्ये पँट्री कारच्या कराराद्वारे सामान्यांना व्यवसाय करण्याची संधी देते. अशाप्रकारे या व्यवसायातून अनेकांना रोजगार मिळतो. तुम्हालाही रेल्वे स्थानकावर स्टॉल लावायचा असेल तर तुम्हाला काय करावे लागेल ते समजून घेऊया... रेल्वे प्लॅटफॉर्मवरील चहा-नाश्त्याच्या स्टॉल्सवाल्यांना मोठे उत्पन्न मिळते. रेल्वे प्लॅटफॉर्म आणि ट्रेन्समध्ये खाद्यपदार्थांच्या विक्रीतून होणाऱ्या उत्पन्नामुळे अनेक स्थानिक दुकानदार आणि नवे तरुण उद्योजक रेल्वेसोबत व्यवसाय करण्याचा विचार करतात. परंतु, पुरेशा माहितीअभावी त्यांना शक्य होत नाही. ट्रेन आणि रेल्वे स्थानकांवर फूड स्टॉल व पॅन्ट्री कारसाठी तुम्ही टेंडरसाठी अर्ज कसा करू शकता, त्याची किंमत किती आहे किंवा किती भाडे भरावे लागेल? ते समजून घेतले पाहिजे.

### प्रोसेस काय

प्रवाशांच्या गरजांसाठी रेल्वे स्थानकावर फूड स्टॉल किंवा इतर आवश्यक वस्तूंचे दुकान उघडण्याची एक प्रक्रिया आहे. भारतीय रेल्वे यासाठी निविदा काढते, त्यासाठी अर्ज करून दुकान सुरू करण्याचा परवाना मिळू शकतो. रेल्वे स्थानकांवरील वेगवेगळ्या स्टॉलची किंमत दुकानांच्या प्रकारावर अवलंबून असते. म्हणजे रेल्वे तुमच्याकडून दुकानाचे आकारमान आणि जागेनुसार शुल्क वसूल करेल. सामान्यतः बुक स्टॉल, चहा-कॉफी स्टॉल आणि फूड स्टॉल उघडण्यासाठी अंदाजे ४० हजार ते तीन लाख रुपये खर्च येतो, तथापि शहर आणि तेथे असलेल्या स्थानकावर वेगवेगळे दर असू शकतात. भारतीय रेल्वे अनेक स्थानकांवर अनेक छोटे स्टॉलदेखील प्रदान करते ज्यांचे भाडे आणि किंमत कमी आहे.

### भारतीय रेल्वेसोबत करा व्यवसाय

IRCTC भारतीय रेल्वेमध्ये अन्न संबंधित सुविधा चालवते आणि त्याच्याशी संबंधित व्यवसाय, मेनू, खाद्यपदार्थांचे दर इत्यादींच्या किमती ठरवते. आता IRCTC स्वतः जनहर केंद्र, फूड प्लाझा, फूड कोर्ट, फास्ट फूड युनिट, ई-कॅटरिंग इत्यादींवर काम करते. अशा परिस्थितीत तुम्हाला ही माहिती फक्त IRCTC कडून मिळवावी लागेल. रेल्वे स्थानकावर खाद्यपदार्थ किंवा इतर कोणताही स्टॉल सुरू करण्यासाठी तुमच्याकडे आधार कार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट, मतदार ओळखपत्र इत्यादी असले पाहिजे. संबंधित रेल्वे स्थानकांवर खाद्यपदार्थांच्या स्टॉलच्या उपलब्धतेसाठी IRCTC आणि भारतीय रेल्वेच्या साइटवरील निविदा विभागाला भेट देऊन माहिती मिळवा. निविदेत भाडे आणि इतर अटींची माहिती देण्यात आली आहे.



## व्यवसाय करताना चुकूनही नकोत या चुका

**पैसे मिळवण्यासाठी लोक खूप मेहनत करतात, पण प्रत्येकाला त्यांच्या मेहनतीचे फळ मिळतेच असे नाही. त्यामुळे वाढत्या स्टार्टअपच्या काळात अनेक जण स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याकडे वळत आहेत. पण आर्थिक अडचणींसह आपला स्वतःचा व्यवसाय सुरु करताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली गेली पाहिजे. असे न केल्यास भविष्यात मोठ्या कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागू शकते.**

वाढत्या तंत्रज्ञानाने तरुणांना व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. आजकाल देशभर स्वतःचा व्यवसाय करणाऱ्या लोकांची संख्या झपाट्याने वाढत असून अनेकजण शिक्षण घेतल्यानंतर नोकरी करण्यापेक्षा व्यवसाय करण्याकडे वळत आहेत. व्यवसायात भरघोस नफा कमावल्यानंतरही अनेक लोक छोट्या चुका करतात, ज्यामुळे त्यांना कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागते. अशा स्थितीत तुम्हीपण जर तुमचा स्वतःचा व्यवसाय करत असाल किंवा सुरू करून पाहत असाल तर काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवून कायदेशीर कारवाई टाळता येऊ शकते.

- कर भरताना विशेष काळजी घ्या : अनेक लोक व्यवसाय करताना करचुकवेगिरी करतात. त्यामुळे तुम्हीपण ही चूक केलीत तर तुमच्यावर कठोर कारवाई होऊ शकते. सरकारने सर्व व्यवसायांवर जीएसटीचे वेगवेगळे दर निश्चित केले असल्यामुळे निश्चित दरांनुसार वेळेवर कर आवश्य भरा नाहीतर तुमच्यावर कठोर कायदेशीर कारवाई होऊ शकते.
- अवैध व्यवसाय : अनेकजण कायदेशीर व्यवसायाच्या नावाखाली अवैध धंदे सुरू करतात किंवा कायदेशीर व्यवसायाच्या नावाखाली अवैध धंदेही सुरू असतात. त्यामुळे तुमची समस्या वाढू शकते. तुम्ही कायद्याच्या



रडारवर आलात तर तुमच्यावर कडक कारवाई होऊ शकते. अशा स्थितीत तुम्ही कायद्याच्या कक्षेबाहेर काम करत असाल, तर तुम्हाला कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते.
- लोगो, ट्रेड मार्क आणि नाव : जेव्हा तुम्ही स्वतःचा व्यवसाय सुरू असता तेव्हा चुकूनही दुसऱ्याचे नाव, ट्रेडमार्क किंवा लोगो वापरू नका. कारण जर तुम्ही नोंदणीकृत व्यावसायिक लोक किंवा दुसऱ्याचे नाव वापरले तर कोणतीही फर्म, नोंदणीकृत कंपनी ज्यांचे नाव किंवा तुम्ही वापरले तुमच्याविरुद्ध गुन्हा दाखल करू शकतात. त्यामुळे व्यवसाय सुरू करण्यापूर्वी व्यवसायाचे नाव, ट्रेडमार्क आणि लोगो निश्चित करणे महत्त्वाचे आहे.

## शॉर्ट न्यूज

### जामखेड शहरात स्वच्छतेचे तीनतेरा

■ **जामखेड :** नगरपरिषदेकडून महिन्याकाठी लाखो रुपये खर्च करूनही शहरातील अनेक भागांत स्वच्छतेचे तीनतेरा वाजले आहेत. सफाई ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे शहराची अवस्था बिकट झाली आहे. शहराच्या काही भागात कचऱ्याचे ढीग साचले आहेत. तसेच शहरात स्वच्छतेची योग्य व्यवस्था नसल्यामुळे कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे नागरिकांना समस्या व आजारांना सामोरे जावे लागत आहे. नगरपरिषदेकडून घंटागाड्यांची सोय करण्यात आली, मात्र असे असतानाही अनेक भागात मुख्य रस्त्याच्या कडेलाच जागोजागी कचऱ्याचे ढीग साठल्याने दिसून येत आहेत.

### मुलाची विचारपूस करत मारहाण

■ **राहाता :** गणेशनगर (ता. राहाता) येथे तुमचा मुलगा अतुल कोठे आहे, अशी विचारणा करत पतीस मारहाण करून घरावर दगडफेक केली. मुलीला घेण्यासाठी आलेल्या पाहुण्यांच्या कारचे नुकसान केल्याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घराच्या दरवाजावर लाथा व लाकडी दांडके मारून दरवाजा तोडून नुकसान केले. घराजवळ उभी असलेली पाहुण्यांच्या कारवर लाकडी दांडके व मोठे दगड टाकून नुकसान केले. याप्रकरणी सुनीता सदाफळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### वेश्याव्यवसाय करणाऱ्या हॉटेलवर छापा

■ **पाथर्डी :** पाथर्डी-तिसगाव रोडवरील हॉटेल मित्रधनवर स्थानिक गुन्हे शाखा व पाथर्डी पोलीस यांच्या संयुक्त पथकाने कारवाई करत हॉटेलवर चालणाऱ्या वेश्याव्यवसायवर पिटा कायद्यांतर्गत कारवाई करत तीन महिलांची सुटका केली आहे. तर हॉटेल चालक मल्हारी पालवे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाथर्डी-तिसगाव रोडवरील हॉटेल मित्रधनवर पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून खात्री केली असता वेश्याव्यवसाय चालू असल्याचे आढळून आले. यानंतर पोलिसांनी हॉटेलवर छापा टाकत मल्हारी रघुनाथ पालवे (वय २८, रा. कसबापेठ) याला पोलिसांनी ताब्यात घेतले.

### तूर्तास पाणी कपातीचे संकट टळले

■ **राहुरी :** बारागाव नांदूर व इतर १४ गाव पाणी योजनेच्या सदस्यांच्या बैठकीत थकित ११ ग्रामपंचायतीकडील ४२ लाख ३९ हजार ३२९ रुपये पैकी सुमारे १२ लाख ५१ हजार रुपयाची वसूली झाल्याने तूर्तास पाणी कपातीचे संकट टळले आहे. आता उर्वरित थकीत रक्कम भरण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींना २८ फेब्रुवारी पर्यंत मुदत दिली आहे. अशाच प्रकारे लवकरात लवकर उर्वरित भरणा करून योजनेस सहकार्य करावे व आपल्या गावचे पाणी कपातीचे संकट टाळावे, असे आवाहन अध्यक्षांसह सदस्यांनी केले आहे.

### राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत वेदिका प्रथम

■ **अकोले :**
येथील अभिनव पब्लिक स्कूलमधील विद्यार्थ्यांनी नागपूर येथे झालेल्या राष्ट्रीयस्तर नृत्य स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन नेत्रदीपक कामगिरी केली. इयत्ता तिसरीतील वेदिका सुनील एरंडे हिने बॉलिवूड स्टाईलमध्ये प्रथम क्रमांक, पाचवीतील आराध्या महेश शिंदे हिने सेमी क्लासिकल डान्समध्ये प्रथम क्रमांक मिळविला. आठवीतील वैभवी सचिन देशमुख हिने फोक डान्समध्ये तृतीय क्रमांक, तर नववीतील प्रिया अरुण कोंडावळे हिने फोक डान्समध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. या विद्यार्थिनींना नृत्यशिक्षिका काव्या कदम यांचे मार्गदर्शन लाभले.

# उपसा सिंचन योजनांच्या कार्यक्षमता वाढीसाठी सर्व्हेक्षण करा

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सूचना



**मुंबई : प्रतिनिधी**
**गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ अंतर्गत असणाऱ्या उपसा सिंचन योजना अधिक कार्यक्षमतेने सुरू राहाव्यात यासाठी या योजनांचे पुन्हा सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. या योजनांच्या कार्यक्षमता वाढीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना तयार करण्याच्या सूचना जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.**

गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ कडील विविध विषयाबाबत सन्माननीय लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठक घेवून विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, सन्माननीय लोकप्रतिनिधींनी त्यांच्या मतदार संघात मागणी केलेली कामे ही लोकहिताची असतात. या कामांच्या मंजुरीमुळे त्या भागातील शेतकऱ्यांचा सिंचनाचा व जनतेचा पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होत असल्याने ही कामे कालबध्द रीतीने पूर्ण झाली पाहिजेत. ज्या योजनांच्या कामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे त्याचा प्रस्ताव सादर करावा. कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधणे, दुरुस्ती करणे या कामात तज्ञांचे मत घ्यावे. पूर संरक्षक भिंत बांधणे बाबत सर्व्हे करावा.

राज्यात सिंचनाचे क्षेत्र वाढून शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी राज्य शासनाने अनेक योजना मंजूर केल्या आहेत. या योजनांची कामे गतीने व दर्जेदार व्हावीत. ही कामे जलद गतीने होण्यासाठी नवीन टेक्नॉलॉजीचा वापर करावा, अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी दिल्या. योजनांसाठी आवश्यक भूसंपादन कालमर्यादेत होणे महत्वाचे असल्याचेही ते म्हणाले.

बैठकीस अपर मुख्य सचिव दिपक कपूर, लाभ क्षेत्र विकास सचिव संजय बेलसरे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक श्री. अतुल कपोले, गोदावरी विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक श्री. संतोष तिरामणवार, जलसंपदा सह सचिव संजीव टाटू, अभय पाठक, उपसचिव प्रवीण कोल्हे यांच्यासह कृष्णा व गोदावरी खोरे विकास महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# सामाजिक उत्कर्षाची आदर्श माता : पार्वतीबाई गोरडे

**आई** या शब्दाची व्याख्या अनेक थोरामोठ्यांनी आपापल्या शब्दात मांडलेली आहेच. आईच्या पोटी जन्माला येणारी मुले आपल्या कार्यकर्तुत्वातून जेव्हा मोठी होतात तेव्हा फक्त त्या मुलांचाच नाही तर त्यांना जन्म देणाऱ्या मातृत्वाचाही सन्मान होत असतो.काळाच्या महिम्यात अनंतात विलीन होऊनही अशाच मातृत्वाच्या सन्मानास मृत्युनंतरही पात्र राहिलेल्या लोणीमावळा ग्राम नगरीचे डॉक्टर नानासाहेब गोरडे यांच्या पत्नी व लोणीमावळा सोसायटीचे माजी चेअरमन कैलास गोरडे व विद्यमान संचालक अरुण गोरडे यांच्या मातोश्री स्व. पार्वतीबाई नानासाहेब गोरडे.

सिद्धेश्वरवाडी या पारनेरलगत असलेल्या गावी पाच भावंडांच्या कावरे परिवारात जन्माला येऊन चार भावांमध्ये एकच बहीण असलेल्या पार्वतीबाईचे बालपण अतिशय लडीवाळपणे गेले. सिद्धेश्वर सोसायटी संस्थेवर जवळपास चाळीस वर्षांपासून एकहाती सत्ता राखणारे दिवंगत चेअरमन बबनराव कावरे यांच्या त्या भगिनी. त्यामुळे सामाजिक व राजकीय वारसा पार्वतीबाईच्या तनामनात बालवयापासूनच ओतप्रेत भरलेला होता. पुढे लोणीमावळा गावचे डॉक्टर नानासाहेब गोरडे यांच्यासोबत पार्वतीबाईची लग्नगाठ बांधल्यानंतर सुरवातीचे अनेक वर्ष डॉक्टरांची जामगाव येथील वैद्यकीय सेवा सुरु राहण्यासाठी त्यांनी तिथेच आपले बस्तान मांडले व नंतर आपल्या पतींची वडीलोपार्जित जमीन कसण्यासाठी त्यांच्या मूळ लोणीमावळा गावी त्या दाखल झाल्या.

आजच्या विभक्त राहणीमानापेक्षा एकत्र कुटुंबपद्धतीचे माहेरचे अवलोकन सासरी देखील तंतोतंत करताना आपल्या पतींचे चार भाऊ व एक बहिण अशा सर्वांचीच मायेने सेवा करण्याची संधी पार्वतीबाईनी कधीच सोडली नाही. मग सुरवातीच्या संसारिक जीवनातील जामगाव येथे असताना फक्त स्वतःच्या मुलांपुरते मर्यादित न राहता आपल्या पुतण्यांचे कौटुंबिक, शैक्षणिक पालन पोषण व नंतरच्या काळातील संपूर्ण कुटुंबाच्या उद्धारासाठी एक स्त्री म्हणून अंगावर पडेल ती प्रत्येक जबाबदारी तितक्याच कर्तव्य दक्षतेने पार पाडण्याची अहम् भूमिका पार्वतीबाईनी बजावली.माहेरचा राजकीय वारसा आणि पतीचे उच्चशिक्षण या दोहोंची खूणगाठ बांधली जात असताना, पोटी जन्माला आलेले अनुक्रमे साहेबराव, कैलास आणि अरुण या तिनही मुलांवर उच्चशिक्षण व राजकारणाचे बाळकडू आपसूकच नानासाहेब व पार्वतीबाई या पती-पत्नींकडून दिले गेले. अर्थात यात पार्वतीबाईचा सिंहाचा वाटा होता.



एकास एक वरचढ पण तितक्याच एकीने कुटुंब बांधून ठेवण्याची लीलया साधणाऱ्या या तीनही मुलांमध्ये थोरला साहेबराव शिक्षक, धाकटा अरुण शासकीय रुग्णालयात कनिष्ठ सहाय्यक तसेच उच्च शिक्षणासोबत शेतीची धुरा सांभाळली जावी या जाणीवेने मधला मुलगा कैलास पदवीनंतर शेतीमधील नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करुन त्याची अंमलबजावणी लोणीमावळा ग्रामनगरीच्या धर्तीवर करु लागला. आपल्या तिनही मुलांना शिक्षणाने परिपूर्ण करण्यासोबत त्यांच्यावर सामाजिक जाणीवेचे वलय चढविण्याचे महत्त्वाचे काम एक आई म्हणून पार्वतीबाईनी केले.शिक्षण, नोकरी, शेतीव्यवसाय इ. सर्व बाजूंनी परिपूर्ण होत असताना आपल्या मातेचा माहेराहून आपसूकच आलेला राजकीय वारसा सिद्ध करताना लोणी मावळा सोसायटी संस्थेच्या माध्यमातून जवळपास १५-२० वर्षे गावचा कारभार या तीनही मुलांनी पाहिला. पार्वतीबाईचे द्वितीय पुत्र कैलास गोरडे यांनी तब्बल पंधरा वर्षे सदर सोसायटीचे चेअरमन पदही भूषविले.असा हा फक्त आपल्या मुलांचाच नाही तर समस्त गोरडे कुटुंबाचा राजकीय उत्कर्षाचा काळ जन्माला घालणाचे श्रेय खऱ्या अर्थाने पार्वतीबाईनाच जाते.


लोणीमावळा व पंचक्रोशीत नावारुपाला आलेल्या गोरडे परिवाराची सामाजिक व राजकीय भूमिका कायमच हुन्नरी राहिली. राजकीय सत्तेचे कायम केंद्र राहिलेल्या या कुटुबांच्या निवासस्थानी सर्वसामान्यांपासून ते राजकीय धुराणींपर्यंत समाजातील सर्वच घटकांची कायम ये-जा सुरु राहिली. त्यामुळे आलेल्या प्रत्येक माणसाकडे जातीने लक्ष देण्याचा एकप्रकारे प्रेमाचा दबावच संपूर्ण कुटुंबावर असे. परंतु, पार्वतीबाईचा मायेचा सागर इतका अथांग होता की घरी आलेल्या प्रत्येकास चहापाणी किंवा जेऊ घातल्याशिवाय रिकाम्या हाताने कधीच परत जाऊ दिले नाही. कदाचित याच समृद्ध मातृत्वाची दखल सामाजिक स्तरावर घेतली जाऊन थोर रामायणाचार्य ह.भ.प. रामरावजी महाराज ढोक यांच्या हस्ते पार्वतीबाईना आदर्श माता पुरस्कार देखील बहाल करण्यात आला.त्यांच्या या समृद्ध गोरडे कुटुंबाची रुपरेषा यशाच्या शिखरावर असताना अचानक थोरला मुलगा साहेबराव गोरडे यांचे अकाली निधन झाले. या घटनेने त्यांच्या मनावर खोलवर आघात झाला.

संपूर्ण कुटुंब बांधून ठेवणाऱ्या थोरल्या पुत्राच्या अपघाती निधनानंतर हळूहळू त्या एकाकी होत गेल्या. कदाचित या दु:खातून त्या बाहेर पडल्याच नाहीत. आणि यातूनच मागील वर्षी २६ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. पार्वतीबाईच्या पश्चात आज त्यांचे पती, दोन मुले, तीन सूना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार, त्यांनी व त्यांचे पती नानासाहेब यांनी घालून दिलेला शैक्षणिक व राजकीय वारसा टिकवून आहेत.वारसा हक्काने मिळणाऱ्या जमीन-जुमला, घरदार याहीपेक्षा लोकांमध्ये जाऊन लोकांचे होणे तसेच सामाजिक व्यासपीठावरुन त्याच लोकांसाठी कार्यरत राहणे हीच खरी संपत्ती व हाच लोकभावनेचा वारसा... आणि असा हा लोकाभिमुख समृद्ध राजकीय वारसा समस्त गोरडे परिवारास मातोश्री स्व. पार्वतीबाई नानासाहेब गोरडे यांच्या रुपाने उगमबिंदू म्हणून मिळाला हेही तितकेच खरे.

शब्दांकन
**श्रीकर मावळे (नात जावई)**

वाचकांच्या लेखणीतून

# कफ़न




मुंशी प्रेमचंद हे हिंदी साहित्यातील दिग्गज साहित्यिक. त्यांची कफ़न मथळ्याची कहानी (कथा) आम्हाला शालेय अभ्यासक्रमात नेमलेली होती. ती शाळेत तर अभ्यासली होतीच. नंतर प्रौढ वयातही ती अनेकदा वाचली. जगातल्या शीर्षस्थानी गणल्या गेलेल्या कथा साहित्यात तिची गणना व्हावी. अशी ती कथा आहे.
मराठी भाषेतील थोर कथाकार शंकरराव खरात यांनी तराळ अंतराळ नामक आत्मचरित्र लिहिले आहे. त्यात आपल्या बालपणीचे वर्णन करताना खरात म्हणतात, माझ्या बापाला कफनाचा कपडा मिळत असे. तो आम्हाला त्याचे कपडे शिवून आणीत असे. आम्हाला खूप आनंद होई. ते वर्णन वाचून आपल्या काळजाला पीळ पडल्याशिवाय राहत नाही.
कफ़न हा मूलतः अरबी शब्द आहे. प्रेतावरील वस्त्राला कफ़न म्हणतात. उर्दू आणि मराठी भाषेतही तो त्याच अर्थाने वापरला जातो.
उर्दू शायरीत कफ़न या शब्दाचे विविध रंगी वर्णन काव्यास्वाद घेण्यासारखे आहे.
माणसाच्या आशा अपेक्षांना अंत नसतो. या गोष्टीचे वर्णन करताना एक शायर म्हणतो
दफ़नाना देखभाल के हसरत भरे की लाश।
लिपटी हुई कफ़न में कोई आरज़ू न हो।।
प्रेताला काळजीपूर्वक दफ़न करा. नाही तर कफ़नाला एखादी इच्छा चिकटून बसायची!
कैफ़ी आज़मी म्हणतात,
इन्सां की ख़्वाहिशों की कोई इंतिहा नहीं।
दो गज़ ज़मीं भी चाहिये, दो गज़ कफ़न के बाद।।
माणसांच्या आकांक्षांना अंत नाही. दोन गज़ कफ़न मिळाल्यावर त्याला दफ़न करण्यासाठी दोन गज़ ज़मीनही पाहिजे.
नासिख़ या शायराचा एक रंगीला प्रेमवीर (आशिक़) म्हणतो-
शहिदे नाज़ हूं उस गुलबदन का।
गुलाबी रंग हो मेरे कफ़न का।।
त्या पुष्पांगीच्या प्रेमाखातर मी शहीद झालो तर माझे प्रेत झाकण्यासाठी जे कफ़न वापरणार त्याचा रंग गुलाबी असूद्या. मला त्याचा अभिमानच वाटेल.
मसूद हयात हे शायर फारच दयाळू भाव व्यक्त करताना म्हणतात,
दुनिया चढ़ा रही है मज़ारों पे चादरें।
लेकिन किसे ख़बर है कोई बेकफ़न भी है।।
दुनिया पीरफकिरांच्या समाध्यांवर चादरी चढवतात; परंतु इतरत्र एखादे बेवारशी आणि बेकफ़न प्रेत पडलेले आहे. त्याची काही गणवार्ता आहे का त्यांना?
एक दार्शनिक प्रतिभा असलेला शायर म्हणतो,
कहीं शादी कहीं ग़म गरज दुनिया दुरंगी है।
पहनता है कफ़न कोई, कोई कपड़े बदलता है।।
दुनिया किती दुतोंडी आहे! एका ठिकाणी विवाहप्रसंगाचा आनंद तर दुसरीकडे दु:खाचा प्रसंग दिसतो. कुठे प्रेतावर कफ़न पांघरतात. तर कुठे जुने टाकून नवे कपडे बदलत आहेत!
म्हणूनच मिर्ज़ा ग़ालिब म्हणतात,
बेलिबास आए थे हम दुनिया में ग़ालिब।
सिर्फ़ एक कफ़न के लिए इतना सफ़र कर गए।।
आम्ही जन्मलो तेव्हा नग्नच होतो; पण मृत्युसमयीच्या केवळ एका कफ़नासाठी (जीवनाचा) एवढा (लांबचा) प्रवास करावा लागला!
उर्दू भाषेत कफ़न खसोट, कफ़न चोर (निर्दयी, कंजूष,प्रेतावरील वस्त्र चोरणारा, दुस-याचा माल हडप करणारा), कफ़न फ़ाड़कर बोलना (जोराने ओरडणे, किंकाळी फोडणे), कफ़न सर से बांधना (जिवावर उदार होणे, तळहातावर शिर घेणे) असे काही सुंदर वाक्प्रचार आहेत. तेही फार काव्यमय वाटतात.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# नक्षलवाद्यांच्या चकमकीत जवान महेश नागुलवार शहीद

## मुख्यमंत्र्यांनी केली श्रद्धांजली अर्पण । कुटुंबाला २ कोटींचे अर्थसहाय्य मंजूर

**गडचिरोली : प्रतिनिधी**
**गडचिरोली येथे नक्षलवाद्यांशी झालेल्या चकमकीत सी-६० तुकडीचे जवान महेश नागुलवार शहीद झाले आहेत. चार्मोशी तालुक्यातील अनखोडा या त्यांच्या मूळ गावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. महेश नागुलवार यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि आई असा परिवार आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील महेश नागुलवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. नक्षलमुक्त भारताच्या अभियानात महेश नागुलवार यांनी राष्ट्रासाठी दिलेले बलिदान आम्ही कधीही विसरणार नाही आणि त्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हंटले आहे. महेश नागुलवार यांना अखेरची मानवंदना देताना उपस्थितांचे डोळे पाणावले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यात फुलनार जंगल परिसरात माओवाद्यांचा तळ आमच्या सी-६० च्या बहाद्दर जवानांनी उदध्वस्त केला आहे. मात्र दुर्दैवाने या कारवाईत सी-६० पथकातील पोलिस अंमलदार महेश कवडू नागुलवार हे गोळी लागून जखमी झाले होते. त्यांना तातडीने हेलिकॉप्टरच्या मदतीने बाहेर काढून गडचिरोलीतील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रयत्नांची शर्थ



करुनही त्यांना वीरमरण प्राप्त झाले.

पुढे देवेंद्र फडणवीस म्हणाले, नक्षलमुक्त भारताच्या अभियानात त्यांनी राष्ट्रासाठी दिलेली आहुती आम्ही कधीच विसरणार नाही आणि त्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही. पोलिस अधीक्षकांशी मी स्वत: बोललो आहे. महाराष्ट्र पोलिस दल आणि आम्ही सारे नागुलवार यांच्या कुटुंबीयांसोबत आहोत. महेश कवडू नागुलवार यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारची मदत आणि विविध लाभांसह २ कोटी रुपये अर्थसहाय्य देण्यात येईल, अशी घोषणा फडणवीस यांनी केली आहे.

(पान १ वरून)

### राजन साळवींचा शिवसेनेत प्रवेश

घेतला होता. परंतु ठाकरेंच्या शिवसेनेकडून सहकार्य मिळत नसल्याने, अखेर राजन साळवी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला. अखेर ठाकरेंना साळवींनी जय महाराष्ट्र करीत धनुष्य हाती घेतले.माजी आ. राजन साळवी यांचे बंधू आणि उपजिल्हाप्रमुख संजय साळवी यांनीही शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे.
ठाकरेंच्या शिवसेना पक्षप्रमुखांना पत्र
राजन साळवी यांनी ठाकरेंच्या शिवसेना पक्षप्रमुखांना पत्र पाठवले. राजापूर विधानसभा मतदारसंघातील पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारत असून, सध्या मतदारसंघातील संघटनांतर्गत घडणार्या राजकारणी घडामोडी पाहता उपनेतेपदाला न्याय देऊ शकत नसल्याने, आपण उपनेतेपदाचा राजीनामा देत असल्याचे त्यांनी म्हटले होते.

### मविआच्या सरपंचाला १ रुपयाही मिळणार नाही !

पण आता आगामी दिवसांत जिल्हा नियोजनाचा निधी असेल, पक्षाचा असो किंवा सरकारचा कोणताही निधी फक्त महायुतीच्या उमेदवारांनाच मिळेल. बाकी कुणालाही काही मिळणार नाही. मी माझ्या कार्यकर्त्यांना सांगितले आहे की, ज्या - ज्या गावात महाविकास आघाडीचे सरपंच आहेत त्यांची यादी काढा. त्या गावांना एक रुपयाचाही निधी मिळणार नाही. गावाचा विकास हवा असेल तर त्यांना भाजपमध्ये प्रवेश करावा लागेल.
महायुतीच्या कार्यकर्त्यांना न्याय दिला जाईल
सरकार तुम्हाला न्याय देईल, तसेच गावाच्या विकासालाही मदत करेल. निधी वाटपात महायुतीचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या गावांना प्राधान्य दिले जाईल. भजापमध्ये प्रवेश केला तरच विकास होईल. उरले सुरले कुणी शिल्लक असतील तर त्यांनी भाजपमध्ये प्रवेस करावा. भाजप एक नंबरचा पक्ष होईल ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. याविषयी कार्यकर्त्यांच्या मनात कोणताही संभ्रम नको. महायुतीविषयी पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील. पण या जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून महायुतीच्या कार्यकर्त्यांना न्याय देण्याचे काम मी करेन.
रोहित पवारांचा नीतेश राणेंवर पलटवार
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणी नीतेश राणे यांच्यावर पलटवार करत त्यांना संविधानाच्या शपथेचा विसर पडल्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले, जिल्हा नियोजनचा निधी किंवा कुठलाही निधी केवळ महायुतीच्या कार्यकर्त्यांनाच भेटेल बाकी कोणालाही भेटणार नाही, जिथे जिथे विरोधी पक्षाचे सरपंच असतील त्या गावाला एक रुपयाही देणार नाही, ज्यांना निधी हवा असेल त्यांनी पक्षप्रवेश करावा,’’ ही मंत्रीमहोदयांची भाषा बघता, त्यांनी मंत्रीपदाची शपथ घेताना शपथेचा मजकूर काळजीपूर्वक वाचलेला दिसत नाही अथवा त्यांना संवैधानिक शपथेचा विसर पडलेला दिसतो.मंत्रीच अशा प्रकारे संविधानाची चिरफाड करणार असतील तर संविधान टीकेला का? मंत्री महोदयांनी संवैधानिक जबाबदारी समजून घेत मंत्र्यांसारखे वागायला हवे. मुख्यमंत्री महोदय आपल्या मंत्र्यांना समाज देतील, ही अपेक्षा!

# अभिजीत आहेर व तेजस जगताप यांचा सत्कार

## मार्गदर्शन केंद्राच्या मदतीबद्दल कृतज्ञता




**निघोज : प्रतिनिधी**

**श्री. मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज येथील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने गुप्तचर अधिकारी म्हणून नियुक्त झालेले चि. अभिजीत सहदेव आहेर आणि चि. तेजस जगताप यांचा त्यांच्या यशस्वी निवडीबद्दल सत्कार करण्यात आला.**

**या सोहळ्याला वसंत कवाद, रामदास घावटे, शांताराम कळसकर, रामदास वरखडे, वसंत वांढेकर, दौलत सुपेकर, अमृता रसाळ आदी मान्यवर उपस्थित होते.**

यावेळी वसंत कवाद व शांताराम कळसकर यांनी मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांनी सातत्याने मेहनत घेतल्यास यश मिळू शकते, असा संदेश दिला. सत्कारमूर्तींनी आपल्या सत्काराला उत्तर देताना महाविद्यालयाच्या मार्गदर्शन केंद्राने केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. सहदेव आहेर, डॉ. विजया आहेर, दत्तात्रय जगताप, माया जगताप यांच्यासह डॉ. प्रवीण जाधव, इतर प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अभिजीत आहेर व तेजस जगताप यांच्या यशामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी आनंद व अभिमान व्यक्त केला.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मनोहर एरंडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. आनंद पाटेकर यांनी केले, तर आभार डॉ. मनिषा गाडीलकर यांनी मानले.

# भिमाशेठ घुले यांच्याकडून तुकाई मंदिराला सभामंडप

## आई,वडिल व पत्नीच्या स्मरणार्थ देणगी

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील कांद्याचे व्यापारी भिमाशेठ घुले यांनी वडील स्व.लक्ष्मण सदू घुले, मातोश्री भिमाबाई लक्ष्मण घुले व पत्नी शांताबाई भिमाशेठ घुले यांच्या स्मरणार्थ भिमाशेठ घुले यांनी तुकाई मंदिरासाठी स्वखर्चातून सभामंडप दिला आहे.**

या सभामंडपाचे नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष व माजी पंचायत समितीचे सदस्य डॉ. भास्करराव शिरोळे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद, माजी सरपंच ठकारामशेठ लंके, माजी सरपंच लताबाई कवाद, डॉ. शंकरराव कवाद, भिमाशेठ घुले, रुपेश ढवण, उद्योजक विजय घुले, पतसंस्थेचे संचालक बाबाजी कळसकर, पतसंस्थेचे वरिष्ठ अधिकारी शांताराम सुरकुंडे तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जालना येथील बाळासाहेब महाराज शिंदे यांच्या हस्ते भिमाशेठ घुले यांचा



सत्कार करण्यात आला. भिमाशेठ घुले व त्यांच्या कुटुंबानी गेली पाच पंचवीस वर्षात निघोज व परिसरात धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. परिसरातील विकासकामांना सातत्याने पाठबळ देत घुले यांनी प्रत्येक सेवाभावी कार्यात सहभागी होऊन मदतीचे दान दिले आहे. कांद्याचे व्यापारी म्हणून भिमाशेठ घुले यांचा लौकिक मोठा आहे. सातत्याने सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांचे योगदान मोठे आहे. एक मनमिळाऊ स्वभावाचे म्हणून ते या परिसरात परिचीत असून तुकाई मंदिरासाठी दिलेल्या सभामंडपाच्या योगदानाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी डॉ. भास्करराव शिरोळे यांनी सांगितले की भिमाशेठ घुले यांनी निघोज आणी परिसरातील विकासासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. आई वडील, पत्नी यांची स्मृती जतन करण्यासाठी त्यांनी सभामंडप देऊन फार मोठे योगदान दिले आहे . बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद यावेळी म्हणाले भिमाशेठ घुले यांचे समाजासाठी योगदान मोठे आहे समाजाचा आर्थिक विकास होण्यासाठी घुले कुटुंबाचे योगदान मोठे आहे. आपला पैसा सामाजिक व धार्मिक कार्यात सत्कारणी लागला पाहिजे त्याचा वापर जनहितासाठी झाला पाहिजे यासाठी भिमाशेठ घुले यांनी मोठ्या प्रमाणात योगदान दिले असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.शंकर कवाद यांनी केले विजय घुले यांनी आभार मानले.

# अध्यापक विद्यालयाचे क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत यश

## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने आयोजन




**लोणी हवेली : प्रतिनिधी**

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर आयोजित क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा पारनेर येथील क्रीडा संकुल या ठिकाणी आयोजित केल्या होत्या. या सांस्कृतिक स्पर्धेत लोणीहवेली येथील अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात यश संपादन केले.**

या विद्यालयातील स्वप्नाली दिनकर भोर निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक , पुनम नामदेव भगत शैक्षणिक साधन निर्मिती तृतीय क्रमांक, सविता चंद्रकांत गडगे पोस्टर स्पर्धा उत्तेजनार्थ बक्षीस, साक्षी रवींद्र पवार,रांगोळी स्पर्धा उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेरचे प्राचार्य डॉ.राजेश बनकर तसेच ज्येष्ठ अधिव्याख्याते लक्ष्मण सुपे,अधिव्याख्याते मुकुंद दहिफळे,नितीन टिळेकर, सांख्यिकी सहाय्यक प्राचार्य उत्तम राजळे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले
यशस्वी विद्यार्थ्यांचे अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य संतोष शिंदे. प्रा. सुरेश खेत्रे, प्रा. रोहिदास शेरकर तसेच लोणेश्वर ग्रामिण विकास मंडळ संस्थेचे सचिव प्रा. संजय दुधाडे, अध्यक्ष श्रीमती विजया कोल्हे, उपाध्यक्ष सुभाष दुधाडे विश्वस्त रोहिणी दुधाडे विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब दुधाडे या सर्वांकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# विद्यार्थ्यांमधील सुप्त कला गुणांना वाव देणे गरजेचे !

## आमदार काशिनाथ दाते यांचे प्रतिपादन

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांमध्ये अनेक सुप्त कला गुण असतात या कला गुणांना वाव देणे गरजेचे असून त्यातूनच उदयाचे भावी कलाकार घडतील असे प्रतिपादन आमदार काशिनाथ दाते यांनी केले.**

पारनेर तालुक्यातील कर्जुले हर्या येथील मातोश्री शैक्षणिक प्रतिष्ठानच्या विविध शैक्षणिक संकुलाच्या मातोश्री फेस्टिवल प्रसंगी ते बोलत होते अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे हे होते.

यावेळी मातोश्री शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा सौ.मीराताई आहेर, सचिव किरण आहेर, लक्ष्मण आहेर,कार्याध्यक्ष डॉ. दिपक आहेर, खजिनदार बाळासाहेब उंडे,संचालिका डॉ. श्वेताम्बरी आहेर,



संचालिका शितल आहेर, डॉ. श्रीकांत पठारे, विश्वनाथ कोरडे, राहुल पा. शिंदे,बापूसाहेब शिर्के अशोक कटारिया,बा. ठ. झावरे शंकरराव नगरे, डॉ.नितीन रांधवन, मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. धनश्री होळकर,फार्मसी प्राचार्य डॉ.राहुल राहणे, इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य कृपाल पवार, सायन्सचे प्राचार्य राहुल सासवडे, टाकळी ढोकेश्वरच्या माजी सरपंच सुनीता झावरे, वासुंद्याच्या सरपंच विमल झावरे, अमोल साळवे उपस्थित होते.

यावेळी विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी, उत्कृष्ट शिक्षक यांचा प्रशस्तीपत्र, सन्मान चिन्ह देवून सन्मान करण्यात आला.या प्रसंगी विद्यार्थी विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.मातोश्री शैक्षणिक संकुलाचे सचिव किरण आहेर यांनी प्रास्ताविक केले.सुजित पा. झावरे, डॉ.दिपक आहेर, राहुल सासवडे, डॉ. श्रीकांत पठारे यांची भाषणे झाली. सुत्रसंचालन मनोज बेल्हेकर यांनी केले.डॉ. दिपक आहेर यांनी आभार मानले.

# केदारेश्वर मंदिराच्या रस्त्याचे भाविकाकडून डांबरीकरण

## स्वखर्चातून काम करून ग्रामदैवताप्रती जपली श्रद्धा



**बाभुळवाडा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील बाभूळवाडे येथे डोंगरावर स्वयंभू श्री.केदारेश्वर देवस्थान आहे. येथील रस्त्याची दुरावस्था झाल्याने भाविकांची होणारी गैरसोय लक्षात घेवून गावचे भूमिपुत्र,बांधकाम ठेकेदार बाळकृष्ण नामदेव जगदाळे यांनी स्वखर्चातून रस्त्याचे डांबरीकरण करून ग्रामदैवताप्रती असणारी श्रध्दा जपली आहे.**

स्व.भीमराव बडदे खासदार असताना १९९८ साली पहिल्यांदा केदारेश्वर मंदिर माथा ते पायथा हा रस्ता डांबरीकरण झाला होता. त्यानंतर २००७-२००८ ला गावचे बळवंतराव शिर्के यांच्या प्रयत्नातून तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत हा रस्ता पुन्हा करण्यात आला होता.परंतु गेल्या १७ वर्षात अक्षरशः दगड उघडे पडले होते व त्यामुळे दर्शनाला येणाऱ्या भाविकांना चालणे देखील मुश्किल झाले होते. केदारेश्वर ट्रस्ट व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून अनेक पत्रव्यवहार करुन देखील रस्ता होत नव्हता. परंतू गावचे सुपुत्र, सध्या पुणे येथे स्थायिक असलेले शिवस्वयंभू रियल्टर्स चे सर्वेसर्वा, बांधकाम ठेकेदार व ट्रस्टचे मा. विश्वस्त बाळकृष्ण नामदेव जगदाळे यांच्या ही गोष्ट लक्षात आल्याबरोबर त्यांनी सदर रस्ता स्वखर्चाने करून देण्याची इच्छा व्यक्त केली. ट्रस्टचे सचिव भिकाजी जगदाळे यांच्याशी त्यांनी संपर्क करून आवश्यक सूचना केल्या. त्यानुसार पुण्याहून रोलर, हायवा, यंत्रसामग्री,मजूर घेऊन गावी आले.

दि.१२ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी केदारेश्वर मंदिर माथा ते पायथा डांबरीकरण पूर्ण केले. तसेच गणपती मंदिर ते मुख्य कमान दरम्यानच्या कच्च्या रस्त्याचे रोलिंग देखील करून दिले. सरकारी योजनेतून देखील होणार नाही असा उत्तम प्रतीचा ५०० मीटर रस्ता श्री बाळकृष्ण यांनी जवळपास १५ लाख रू खर्च करून केदारेश्वरावर असलेल्या श्रद्धेपोटी स्वखर्चाने करून दिला.

याप्रसंगी बाळकृष्ण जगदाळे व त्यांच्या सुविद्य पत्नी , दोन्ही मुले, ट्रस्टचे भिकाजी जगदाळे, कचरू खणकर, अनंथा मातेरे, सविता जगदाळे, लक्ष्मीबाई बोरुडे, बाळू नवले, गणेश जगदाळे, निवृत्ती जगदाळे, प्रकाश जगदाळे, संतोष जगदाळे, दिलीप जगदाळे, बी.पी.जगदाळे, दत्तात्रय क्षीरसागर, भाऊ खोडदे व अन्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी केदारेश्वर ट्रस्ट व समस्त ग्रामस्थांच्या वतीने श्री बाळकृष्ण जगदाळे यांचा सपत्नीक शाल श्रीफळ व श्रींची प्रतिमा देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच समस्त ग्रामस्थांच्या वतीने मनः पूर्वक आभार मानण्यात आले.

# सुपा एमआयडीसीत उद्योजक,अधिकाऱ्यांची बैठक

## जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांची उपस्थिती । विविध समस्यांवर चर्चा


(छाया - शरद रसाळ, सुपा)

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सुपा जुन्या व नवीन वसाहतीमधील उद्योजकांची बैठक जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस ०७ कलमी कृती आराखडा कार्यक्रम अनुषंगाने जीएमसीसी, मायडिया प्रा.लि. कंपनी हॉल सुपा एम.आय.डी. सी.सुपा येथे पार पडली.**

जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, पोलीस अधीक्षक राकेश ओला, सुपा एमआयडीसी अध्यक्ष अनुराग धुत,प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर ,तहसिलदार गायत्री सैंदाणे , उपविभागीय पोलीस अधिकारी संपतराव भोसले, एम.आय.डी. सी. ऑफिसचे श्री बडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे व पदाधिकारी यांच्याप्रमुख उपस्थितीत उद्योजकांची बैठक घेण्यात आली.
यावेळी बैठकीत सुपा शहरातील अतिक्रमण काढणे, फायरब्रिगेड स्टेशन, ट्रक पार्किंग टर्मिनल, हॉस्पिटल, औद्योगिक वसाहतीमधील टपऱ्या काढणे, औद्योगिक वसाहतीमधील वाहतूक समस्या, औद्योगिक वसाहतीमधील गुन्हेगारावर मोक्का व एमपीडीए अंतर्गत कारवाई करणे, तात्काळ गुन्ह्यांची नोंद करणे, औद्योगिक वसाहतीमध्ये पेट्रोलिंग करणे, एमआयडीसी मध्ये काळ्या काचा असलेल्या गाड्यांवर कारवाई करून त्या गाड्या जप्त करणे, तसेच एमआयडीसी मधील गुंडगिरी मोडून काढणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.
सदर बैठकीत उद्योजकांच्या समस्यांबाबत माहिती घेण्यात आली व काही समस्यांचे निराकरण करण्यात आले.
सदर बैठक प्रसंगी सुपा एमआयडीसी कंपन्याचे मॅनेजर व प्रतिनिधी सह ७५ उद्योजक उपस्थित होते. यावेळी सदर बैठकीदरम्यान जीएमसीसी कंपनी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

# बालकलाकारांच्या कलाविष्काराने ग्रामस्थ मंत्रमुग्ध !

## जांभुळवाडी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सुपा येथील जांभूळवाडी व कोल्हेवस्ती शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. बालकलाकारांनी आपल्या कलाविष्कारातून उपस्थित प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडले.**




जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी सलग ३ वर्षापासून गावच्या सरपंच मनीषाताई रोकडे यांनी पुढाकार घेतला आहे. यासाठी आवश्यक असलेले व्यासपीठ मंडप डेकोरेशन साऊंड सिस्टिम उपलब्ध करून देण्यात येत आहे. जिल्हा परिषद शाळांना सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही यावेळी सरपंच रोकडे यांनी दिली.

कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हास्ते दिप प्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी गणेशवंदना करत कार्यक्रमाची सुरुवात झाली. बालकलाकारांनी तीन तास आपला कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली.यामध्ये गोंधळ गीत, राधा कृष्णा गीत, साऊथ साँग, कोळीगीत, लावणी अशी वेगवेगळ्या प्रकारची गीते सादर करण्यात आली. हिरकणी या गीताने स्नेहसंमेलनाची रंगत उत्तरोत्तर वाढत गेली. उपस्थित हजारो पालक व नागरिकांनी विद्यार्थ्यांवर बक्षीसांचा वर्षाव केला.

कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस, पारनेर पं स. गटशिक्षणाधिकारी सिमा राणे, सुपा बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी ढवळे, भिवसेन पवार, केंद्रप्रमुख चांगदेव गवळी, सुपा पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे, शिक्षक नेते गोकूळ कळमकर, शिक्षक बँकेचे संचालक सुर्यकांत काळे , कारभारी बाबर, चंद्रकांत गट सर, संदिप ठाणगे, आबा दळवी,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जालिंदर टोणगे, दत्तात्रय कुसाळकर उपस्थित होते.
कार्यक्रमाच्या नियोजनासाठी जांभूळवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका कांता बनकर , सहशिक्षिका सुवर्णा पवार, मिना चाकणे, मनिषा ताजवे तसेच कोल्हे वस्ती शाळेचे श्री दरेकर यांनी परिश्रम घेतले.सुत्रसंचालन सचिन परांडे व अमोल सोनवणे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार संतोष ढोरजकर यांनी मानले.

# काटाळवेढयात टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

## २१ फेब्रुवारीला प्रारंभ । राहुलशेठ गुंड मित्रपरिवाराच्या वतीने आयोजन

**काटाळवेढा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील काटाळवेढा येथील युवा उद्योजक राहुलशेठ गोपीनाथ गुंड मित्र परिवार (आर.जी.ग्रुप ) च्या वतीने महाशिवरात्री निमित्ताने भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून या क्रिकेट स्पर्धेला शुक्रवार दि २१ रोजी मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात येणार आहे.**

काटाळवेढे येथील ओम साई क्रिकेट टीमच्या वतीने यंदा प्रथमच महाशिवरात्री निमित्त गावामध्ये भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये प्रथम क्रमांक -५१००० रुपये ,द्वितीय-४१०००, तृतीय क्रमांक -३१०००, चतुर्थ क्रमांक -२१००० असेल व येणाऱ्या संघाला मान्यवराकडून मोठ्या प्रमाणात बक्षीस ठेवण्यात आली आहेत. फायनल साठी विशेष आकर्षण हे चिअर्स गर्ल्स या मराठी संस्कृती प्रमाणे गाण्यावर मनोरंजन करणार आहे.



काटाळवेढा ग्रामपंचायत हद्दीतील मेंटोक फाटा येथील भाईक पाटील मैदानावर पारनेर तालुक्यातील सर्वाधिक पारितोषिके असलेली स्पर्धा म्हणून खेळाडूंना एक वेगळी दिशा देणारी स्पर्धा ठरणार आहे. या खेळातून स्थानिक खेळाडूंना हक्कांचे व्यासपीठ मिळेल.संपूर्ण राज्यामध्ये टेनिस क्रिकेट खेळाला मिळालेली व्याप्ती आणि खेळाडूंच्या प्रोत्साहनासाठी त्यांना दर्जेदार आणि व्यावसायिक व्यासपीठ (प्लॅटफॉर्म) मिळण्याच्या दृष्टीकोनातून आर. जी.ग्रुप आयोजित टेनिस क्रिकेट स्पर्धा विशेषतः ग्रामीण भागातील या सर्व खेळाडूंना एकत्रित करून त्यांच्याकरीता ही स्पर्धा आयोजित करणे अत्यावश्यक आहे या दृष्टीकोनातूनच या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

या स्पर्धेला आ.काशिनाथ दाते सर, माजी जि.प.उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, भाजपा प्रदेश सदस्य विश्वनाथ कोरडे, मातोश्री शैक्षणिक संकुलचे संचालक डॉ.दीपक लक्ष्मण आहेर, विजय औटी हे उपस्थित राहणार आहे अशी माहिती काटाळवेढे गावचे मा.उपसरपंच गणेश पवार यांनी दिली आहे. या संपूर्ण स्पर्धेचे भव्य दिव् आयोजन ओम साई मित्र क्रिकेट क्लब व आर.जी.ग्रुप करणार आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com